**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**गुरुवार दिनांक ५ मार्च २०२६**
**ठळक बातम्या**

**1. यंदा अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ७ पूर्णांक ९ दशांश टक्के राहण्याचा अंदाज; वर्ष २०२५-२६ चा आर्थिक पाहणी अहवाल विधानसभेत सादर**
**2. नागपुरातील स्फोटक कारखाना अपघात प्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाल्याची राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांची विधानसभेत स्पष्टोक्ती**
**3. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्यात गेल्या वर्षी सुमारे 3 लाख 95 हजार घरकुलांचं बांधकाम पूर्ण झाल्याची ग्रामविकास मंत्र्यांची माहिती**
**4. टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना आज भारत आणि इंग्लंड दरम्यान मुंबईत वानखेडे मैदानावर रंगणार**
**आता सविस्तर बातम्या …….**

**आर्थिक पाहणी अहवाल**
राज्याची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्थांपैकी एक असून चालू आर्थिक वर्षात ती ७.९ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६ या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील संतुलित वाढ, पायाभूत सुविधांमधील मोठी गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या सुधारणा यामुळे राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता अधिक बळकट झाल्याच अहवालात नमूद करण्यात आल आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६ अहवाल विधानसभेत वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी तर विधानपरिषदेत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सादर केला. कृषी आणि संलग्न क्षेत्रात ३ पूर्णांक ४ दशांश टक्के, उद्योग क्षेत्रात ५ पूर्णांक ७ दशांश टक्के आणि सेवा क्षेत्रात ९ टक्के वाढीचा अंदाज या अहवालात वर्तवण्यात आला आहे.या आर्थिक वर्षात राज्याची आर्थिक महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी तर महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी राहील असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे.राजकोषीय तूट २ पूर्णांक ७ दशांश टक्के तसेच महसुली तूट ९ दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे.
राज्याच्या ऋणभारात ११ पूर्णांक १ दशांश टक्के वाढ अपेक्षित असून चालू आर्थिक वर्षात राज्यावर ९ लाख ३२ हजार २४२ कोटींचा ऋणभार आहे. त्याचप्रमाणे राज्याचं

दरडोई उत्पन्न ३ लाख ४७ हजार ९०३ रुपये असल्याचं अहवालात म्हटलं आहे.आगामी वर्षाचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या सभागृहात सादर करतील. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून

*(व्हॉइस कास्ट - नम्रता)*

*नागपुरातील एका स्फोटकाच्या कारखान्यात स्फोट होऊन २२ जण मृत्युमुखी पडल्यावरून आज विधानसभेत विरोधी पक्षाने सरकारला धारेवर धरलं. कारखान्याचा मालक आणि अधिकाऱ्यांवर हत्येचा गुन्हा दाखल करावा आणि कारखाना बंद करावा अशी मागणी विजय वडेट्टीवार, नाना पटोले, संजय मेश्राम यांनी केली. कारखान्याचं ऑडिट होऊनही इथं स्फोट होत असेल तर निरीक्षकावरही गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. याप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला असून योग्य ती कारवाई केली जाईल असं राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी सांगितलं.*
*सरकारच्या उत्तरावर समाधान न झाल्याने विरोधी पक्ष सदस्यांनी हत्येचा गुन्हा दाखल करण्यचा आग्रह धरला. यावर या प्रकरणी विभागीय चौकशीचे आदेश दिले आहेत, याचा अहवाल आल्यानंतर गुन्हे दाखल करण्याचा विचार केला जाईल असं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितलं. यानंतर विरोधी पक्षाने सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्याचा आरोप करत घोषणाबाजी करत सभात्याग केला.चंद्रपूर सिमेंट कंपनीत झालेल्या अपघातात दोन जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. त्यांनाही ५० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून केली. चंद्रपूर इथे या संदर्भात बैठक घेण्यात येईल. कामगार कायद्यात आवश्यक बदल सुचवण्यासाठी आमदारांची एक समिती गठीत केली जाईल असं उत्तर मंत्र्यांनी विधानसभेत दिल.राज्यातील सिकलसेल या आनुवंशिक आजाराविरुद्ध सुरू असलेल्या अभियानाला वेग देण्यात आला असून आतापर्यंत ५९ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित तपासणी १५ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत दिली सिकलसेल रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेतून मदत तसेच महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गतही उपचारांचा लाभ देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितल.प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गेल्या वर्षी राज्यात जवळपास चार लाख*

***घरकुलांच बांधकाम पूर्ण करण्यात आल असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य अमोल मिटकरी यांनी प्रश्न उपस्थित केला. गेल्या वर्षी राज्यातील 28 लाख 24 हजार 386 घरांना मान्यता देण्यात आली. ही देशाच्या इतिहासातील घरकुलांची सर्वात मोठी मंजुरी आहे. गेल्या एका वर्षात राज्यात 3 लाख 95 हजार 222 घरकुलांचं बांधकाम पूर्ण झाल असून सध्या 23 लाख 92 हजार 242 घरकुले प्रगतीपथावर आहेत, असं त्यांनी सांगितलं.***

***आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके***

**राज्यसभा**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीकरता १० राज्यांमधल्या ३७ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आज शेवटचा दिवस आहे. उमेदवारी अर्जांची छाननी उद्या होणार असून ९ मार्च पर्यंत अर्ज मागे घेता येतील. येत्या १६ मार्चला मतदान होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर होतील.

**जनगणना**

देशात २०२७ ला जनगणना होणार असल्यानं त्यापार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत चार डिजीटल साधनांचं औपचारिक उद्घाटन झालं.यात हाऊसलिस्टिंग ब्लॉक क्रिएटर वेब ॲप्लिकेशन, एचएलओ मोबाईल ॲप्लिकेशन, स्व-गणना पोर्टल, जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली पोर्टलचा समावेश आहे. याचवेळी गृहमंत्र्यांनी जनगणना २०२७ साठी महिलांसाठी प्रगती आणि पुरुषांसाठीच्या विकास या शुभंकरचं औपचारिक उद्घाटनही केलं.

**महाराजस्व समाधान शिबीर**

नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिला यांच्या महसूल विभागांशी संबंधित प्रश्नांचं निराकरण करण आणि जनतेच्या तक्रारी तात्काळ निकाली काढण, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ अंतर्गत नागपूर जिल्ह्यात 13 मंडळस्तरावर दिनांक 7 ते 14 मार्च आणि एप्रिल महिन्यात 10 ते

17 एप्रिल या कालावधीत तसंच शहरी भागात नगरपालिकास्तरावर दिनांक 8 ते 15 मे दरम्यान शिबिरांचं आयोजन करण्यात आल आहे. या शिबीराचा नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांनी अवश्य लाभ घ्यावा, अस आवाहन जिल्हाधिकारी डॉ . विपीन इटनकर यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत केल. या मंडळ स्तरीय शिबिरादरम्यान सेवा हक्क अधिकाऱ्यांच्या अंतर्गत 17 सेवा उपलब्ध राहणार असून यामार्फत कागदं पत्रांची तात्काळ पोहोच नागरिकांना मिळणार आहे. त्याचप्रमाणे तुकडेबंदी, फेरफार शिबिर ,पोटहीस्सा, भूमी अभिलेखाची दुरुस्ती ,ई-मोजणी अशा सर्व योजनांचे देखील या शिबिरादरम्यान समाधान केल जाईल. दरम्यान महिलांमध्ये गर्भाशयाचा कर्करोग -सर्वाइकल कॅन्सरचे निदान करण्यासाठी 14 ते 15 वयोगटातील मुलींना त्यांच्या पालकांच्या संमतीने 9 मार्चपासून एचपीव्ही प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणार असून हे अभियान 90 दिवस चालणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली .दरम्यान नागपूर जिल्हयातील एसबीएल ही स्फोटकांची कंपनी बंद केली असून पेट्रोलियम आणि औद्योगिक सुरक्षा संस्था -पेसो तसेच औद्योगिक सुरक्षा संचलनालय- डीश यांच्या कार्यप्रणालीत जिल्हा व्यवस्थापन कायद्यानुसार काही अधिकच्या अटी घालण्याबाबत चाचपणी सुरू आहे. आतापर्यंत मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना 75 लाखांचे धनादेश वितरित केले असल्याच देखील त्यांनी सांगितलं.

**वाहतूकदार संप**

ई-चलान पद्धत बंद करण्याच्या मागणीसाठी सर्व वाहतूकदारांनी संप पुकारला आहे. पण महसूल वाढवण्यासाठी नव्हे तर वाहतूकविषयक नियमांचं काटेकोर पालन होण्यासाठी ही पद्धत सुरू केल्याचं सरकारचं म्हणणं आहे. वाहतूकदारांच्या सर्व संघटनांशी समन्वय साधण्याचे सरकारचे प्रयत्न सुरू असून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातल्या सर्व वाहतूकदारांना संप मागे घेण्याचं आवाहन केलं आहे.

**पश्चिम आशिया संघर्ष**

इराण, इस्त्राइल आणि अमेरिकेच्या दरम्यानचा पश्चिम आशियातील संघर्ष आता अधिक तीव्र झाला असून हे तिन्ही देश विविध आखाती देशांमधील एकमेकांच्या

महत्त्वाच्या केंद्रावर क्षेपणास्त्र हल्ले करत आहेत. इस्रायलच्या वायुदलानं आज पुन्हा इराणवर एकामागोमाग एक हल्ले केले असून यात तेहरानमधल्या अनेक इमारतींना लक्ष्य करण्यात आल आहे. इस्रायलनं आज लेबनन मधल्या अनेक लष्करी तळांवर देखील हल्ले केले.. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रवास रद्द करावा लागलेल्या प्रवाशांना प्रवासाची तारीख बदलण्याचा किंवा तिकीटाचे पूर्ण पैसे परत घेण्याचा पर्याय एअर इंडियानं उपलब्ध करुन दिला आहे. पश्चिम आशियासह युनायटेड किंग्डम आणि युरोपला जाणाऱ्या किंवा तिथून भारतात येणाऱ्या १० मार्चपर्यंतच्या एअर इंडिया कंपनीच्या विमानांसाठी हा पर्याय उपलब्ध असेल. मात्र यासाठी तिकीटाचं आरक्षण २८ फेब्रुवारीपूर्वी निश्चित केलेलं असणं आवश्यक आहे.

**टी-ट्वेंटी क्रिकेट**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज उपान्त्य फेरीचा दुसरा सामना भारत आणि इंग्लंड दरम्यान होणार आहे. मुंबईत वानखेडे मैदानावर संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. या सामन्यातला विजेता संघ येत्या रविवारी विजेतेपदासाठी न्यूझीलंड सोबत खेळेल.

**हवामान**

विदर्भातल्या अकोला जिल्ह्यात आज देखील उच्चांकी कमाल तापमान कायम असून गेल्या 24 तासात 39 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे . त्या पाठोपाठ वर्धा इथं 38 पूर्णांक 9, अमरावती इथं 38 पूर्णांक 8, तर वाशीम इथं 38 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आल आहे. नागपुरात 37 पूर्णांक 2 इतक्या कमाल तर 14 पूर्णांक 6 इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

*****